शुल्क परतावा प्रक्रिया टाळण्याची मागणी

'अभाविप'चे सरकारला निवेदन

लोकसत्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना संपूर्ण परीक्षा शुल्कमाफीचा निर्णय स्वागतार्ह आहे. मात्र, विद्यार्थ्यांनी आधी शुल्क भरायचे आणि तीन-चार महिन्यांनी शासनाकडून परतावा मिळवायचा, ही प्रक्रिया टाळली पाहिजे. विद्यापीठांनी विद्यार्थ्यांकडून शुल्क न घेता ते स्वनिधीतून भरावे आणि नंतर शासनाकडून त्याची प्रतिपूर्ती करून घ्यावी. संकटकाळात विद्यार्थ्यांना आर्थिक दिलासा देणे, हीच या शुल्कमाफीची खरी अंमलबजावणी ठरेल, अशी मागणी अभाविप देवगिरी प्रदेशमंत्री डॉ. वरुणराज नन्नवरे यांनी केली आहे.

परीक्षा शुल्कमाफीवर चर्चा

विद्यापीठाच्या विद्यार्थी संघटनांच्या मोबाइल फोन गटावर लोकसत्तामध्ये प्रकाशित 'दुष्काळाची धग अभ्यासिकांपर्यंत'चे वृत्त पसरले होते. त्यावर विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क माफ करण्यावर बरीच चर्चा झाली होती. यापूर्वीच्या घोषित परीक्षा शुल्क माफीचा हिशेब काय, याचीही माहिती समोर यावी, अशी मागणी पुढे आली होती.

महाराष्ट्रातील पावसाअभावी निर्माण झालेल्या परिस्थितीची तातडीने दखल घेऊन दुष्काळ जाहीर करावा व दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती देण्यात याव्यात, अशी मागणी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने केली होती.

या मागणीची दखल घेत राज्य शासनाने राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळाचा पहिला टप्पा लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. याबरोबरच दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना संपूर्ण परीक्षा शुल्कमाफी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती देत आर्थिक संकटाचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होऊ नये, यासाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा असल्याचे अभाविपकडून काढण्यात आलेल्या पत्रकात म्हटले आहे.

५ ऑक्टोबरपासून पीक नुकसानीचे पंचनामे सुरू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पंचनाम्याची प्रक्रिया वेगाने व पारदर्शक पद्धतीने पूर्ण करून एकही नुकसानग्रस्त शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, याची प्रशासनाने दक्षता घ्यावी. दुष्काळग्रस्तांसाठी जाहीर केलेल्या सर्व सवलतींची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

दरम्यान, परीक्षा शुल्क माफीच्या निर्णया संदर्भात उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे संचालक शैलेंद्र देवळाणकर यांच्याशी दोनवेळा संपर्क साधला असता प्रतिसाद मिळाला नाही.

छत्रपती संभाजीनगर येथील सहसंचालक कार्यालयाशी संपर्क केला असता तेथून अशा प्रकारच्या निर्णयाची माहिती अद्याप आली नसल्याचे सांगण्यात आले.

'टोकाई' सहकार तत्त्वावर चालवा

सभासदांची आमदार राजू नवघरेंकडे मागणी

लोकसत्ता वार्ताहर

हिंगोली : वसमत तालुक्यातील कुरुंदा येथील टोकाई सहकारी साखर कारखाना स्थापनेपासूनच आर्थिक अडचणींच्या चक्रातून बाहेर पडू शकलेला नाही. विविध करार, व्यवस्थापनातील बदल आणि आर्थिक संकटांनंतरही कारखान्याची स्थिती सुधारलेली नसताना आता भाडेतत्त्वावरील व्यवस्थापनामुळे सभासद शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्यामुळे कारखाना भाडेतत्त्वावर न चालविता पुन्हा सहकार तत्त्वावरच सुरू करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी कारखान्याच्या सभासदांनी आमदार राजू नवघरे यांच्याकडे केली आहे.

कारखान्याच्या सभासदांच्या शिष्टमंडळाने आमदार नवघरे यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. कारखान्याची उभारणी शंकरराव खराटे आणि सखारामजी बागल यांच्या पुढाकारातून झाली. तत्कालीन मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांच्या हस्ते भूमिपूजन झाल्यानंतरही प्रत्यक्ष उभारणीला अनेक वर्षे लागली. माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या सहकार्यातून उभारणीला वेग आला; मात्र, कारखाना सुरळीतपणे उभा राहण्याआधीच आर्थिक अडचणींचे संकट कायम राहिले. त्यानंतर पूर्णा सहकारी साखर कारखान्याच्या मदतीने काही करारांद्वारे टोकाई सुरू करण्यात आला. आर्थिक देणी वाढत गेल्याने कारखाना विक्री करण्याचे आदेशही काढण्यात आले होते. मात्र, तांत्रिक अडचणींमुळे विक्री होऊ शकली नाही. अखेर कारखाना कराराद्वारे भाडेतत्त्वावर देण्यात आला. भाडे तत्त्वावर दिल्यानंतर त्यामध्ये सुधारणा होण्याऐवजी ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा अडचणीत वाढ झाली.

लक्ष्मी अर्बन को-ऑप बँक लि. लातूर

मंठाळे नगर जवळ, लातूर - ४१३५१२

सांकेतीक ताबा नोटीस - स्थावर मिळकती करिता

ज्या अर्थी **लक्ष्मी अर्बन को-ऑप बँक लि: लातूर. शाखा नांदेड,** लातूर बँकेचा प्राधिकृत अधिकारी म्हणून मला सेक्युरिटायझेशन अँन्ड रिकन्सट्रशन ऑफ फायनान्सीयल ॲसेट्स अँन्ड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट २००२ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकार व शक्तीचा वापर करून कलम १३ (१२) व सेक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स २००२ चे नियम ९ नुसार **दि.०४/०६/२०२६** रोजी **कर्जदार-सौ. जसवंत कौर प्रदीपसिंग कोचर,** अबचल रेसिडन्सि, चिखलवाडी, कुंभार गल्ली, नांदेड यांना नोटीस देण्यात आली होती व त्यांना नोटीस नुसार रक्कम रु.१२,२९,४१३/- **(अक्षरी रु. बारा लाख एकोणतीस हजार चारशे तेरा रु. मात्र)** पुढील व्याज खर्च सदर नोटीस मिळाल्या पासून ६० (साठ) दिवसांच्या आत मुदतीत भरण्याबाबत फर्माविले होते कर्जदार यांनी नोटीस मध्ये मागणी केलेली रक्कम दिलेल्या मुदती मध्ये भरणा केली नसल्याने त्यांना बँकेने पुन्हा एकदा **दि.०३/०९/२०२६** रोजी नोटिस दिली तरीही भरणा केला नाही या नोटीसीने कर्जदार / मॉडगेजर / जामीनदार व तमाम जनतेला कळिवण्यात येते कि, खाली सही करणार यांनी सदर कायद्याचे कलम १३ (४) व त्याखालील नियम ९ नुसार त्यांना प्राप्त झालेल्या अधिकारास अनुसरून खालील नमूद केलेल्या मालमत्तेचा **सांकेतीक ताबा दि २२/०९/२०२६** रोजी प्राधिकृत अधिकारी यांनी सांकेतीक ताबा घेतला आहे. कर्जदार / मॉडगेजर / जामीनदार व तमाम जनतेला या नोटीस द्वारे ताकीद देण्यात येते कि, खाली नमूद केलेल्या मिळकती बाबत कोणी कोणताही व्यवहार करू नये. या उपरही व्यवहार केल्यास तो व्यवहार बँकेवर बंधनकारक राहणार नाही आणि असा कोणताही झालेला व्यवहार **लक्ष्मी अर्बन को ऑप बँक लि, लातूर, शाखा -नांदेड** यांच्या बोजासह केला आहे, असे समजले जाईल. स्थावर मालमत्तेचे वर्णन व तपशील खालीलप्रमाणे आहे. NPA DATE २५/०५/२०२६) **दि.२२/०९/२०२६ सांकेतीक ताबा वेळ दुपारी २.३६ मी.)**

स्थावर मिळकतीचे वर्णन **कर्जदार सौ. जसवंत कौर प्रदीपसिंग कोचर** यांच्या मालकीचे अबचल रेसिडेन्सि, चिखलवाडी, कुंभार गल्ली, नांदेड महानगरपालिका हद्दीतील मालमत्ता सीटीएस क्र. २७२६ मालमत्ता शिट क्र. २०० म.न.पा.क्रं ३-४-८०,३-४-८३ (जुना) क्र. ३-४-८९, ३-४-९२ (नवीन) फ्लॅट नंबर १०३ क्षेत्रफळ ६२३ स्क्वे. फुटं तारण गहान **ज्यांच्या चतुःसिमा** खालील प्रमाणे आहेत.

पूर्व :- फ्लॅट नंबर १०२, **दक्षिणः-** सामाईक पसेज व सामाईक पायऱ्या, **पश्चिम :** नरेंद्र सिंघ यांचे घर, **उत्तरः-** जसवंत, जनेवाले

जामीनदार :

१) कुबेरकर अत्तारसिंग विठ्ठलसिंग, गुरुद्वारा बोवली साहेब, गांधी विद्यालय, नांदेड

२) चव्हाण बलजीत कौर गुरुदीप सिंग, बाडपुरा नांदेड

वेळ : दुपारी ०२:३६ मी.
ठिकाण : नांदेड

टिप : स्वैर भाषांतर, तफावत असल्यास मुळ इंग्रजी ग्राह्य.

स्वाक्षरी /-
प्राधिकृत अधिकारी
श्री. संतोष श्रीनिवासजी बनभेरु
Mob. No.7770014906
लक्ष्मी अर्बन को-बँक लि., लातूर.

शेतकऱ्यांच्या मदतीसाठी शासन प्रयत्नशील

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची ग्वाही

लोकसत्ता वार्ताहर

परभणी : मी स्वतः मराठवाड्याची असल्याने येथील शेतकऱ्यांच्या अडचणी आणि येथील दुष्काळी परिस्थितीची मला जाणीव आहे. शेतकऱ्यांच्या भावना आणि त्यांच्या अडचणींची शासनाने गांभीर्याने दखल घेतली आहे. कोणत्याही शेतकऱ्याला वाऱ्यावर सोडले जाणार नाही. शेतकऱ्यांना शक्य तितक्या लवकर मदत मिळावी, यासाठी शासन प्रयत्नशील आहे. चारा आणि पाण्याबाबत शेतकऱ्यांनी काळजी करू नये, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिली.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी शनिवारी परभणी जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त परिस्थितीची पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधला.

> राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन ठामपणे उभे आहे. खरीप हंगामातील परिस्थिती लक्षात घेऊन राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी उपाययोजना लागू करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय शेतकरी आणि ग्रामस्थांना दिलासा देणारा आहे. या निर्णयाचा लाभ परभणी जिल्ह्यातील सर्वच तालुक्यांना होणार आहे.
> **- सुनेत्रा पवार,** उपमुख्यमंत्री

यावेळी शेतकऱ्यांनी पिकांचे नुकसान, पावसातील प्रदीर्घ खंड, भविष्यातील पाण्याची उपलब्धता तसेच जनावरांसाठी चाऱ्याची गरज याबाबत उपमुख्यमंत्री पवार यांच्याशी संवाद साधला.

उपमुख्यमंत्री पवार यांनी मरडसगाव (ता. पालम) येथील अझर अहमद मोहोयुद्दीन सरवर, दैठणा (ता. परभणी) येथील शेषराव हरिभाऊ गायकवाड, पाथरी येथील बालासाहेब साहेबराव नाईक या शेतकऱ्यांच्या शेतात जात पाहणी केली. पाहणीवेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, आमदार प्रतापराव पाटील-चिखलीकर, आमदार विक्रम काळे, आमदार राजेश विटेकर, माजी आमदार मधुसुदन केंद्रे, पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, अपर जिल्हाधिकारी शोभा जाधव, उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर, संगीता चव्हाण, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भास्कर कोळेकर यांच्यासह संबंधित अधिकारी, पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

संकटात शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे आश्वासन

लोकसत्ता वार्ताहर

बीड : पावसाने पाठ फिरवल्यामुळे संकटात सापडलेल्या बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना धीर देण्यासाठी उपमुख्यमंत्री तसेच पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी जिल्ह्यातील माजलगाव आणि गेवराई तालुक्यातील दुष्काळग्रस्त गावांना भेटी दिल्या. अशा संकटात शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही, शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

दौऱ्यात पालकमंत्र्यांनी माजलगाव तालुक्यातील माली पारगाव, वारोळा आणि गेवराई तालुक्यातील सिरसदेवी येथील दुष्काळग्रस्त भागाची पाहणी केली. शेतात जाऊन सोयाबीनसह इतर पिकांच्या नुकसानाचा आढावा घेतला. यावेळी येथील शेतकऱ्यांनी मागील एक दीड महिन्यांपासून पावसाचा थेंबही पडला नाही, त्यामुळे शेतीबरोबरच जनावरांना चारा आणि पाणी देखील देणे अवघड झाल्याचे सांगितले. शेतकऱ्यांचे जे नुकसान झाले आहे, त्याप्रमाणे त्यांना नुकसानभरपाई आणि आवश्यक ती मदत मिळेल. सरकारकडून दुष्काळ जाहीर झालेला आहे. शासनाच्या माध्यमातून पुढील कार्यवाही करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

या पाहणी दौऱ्यात सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, आमदार प्रकाश सोळुंके, आमदार विजयसिंह पंडित, आमदार विक्रम काळे, आमदार राजेश विटेकर, आमदार प्रताप पाटील चिखलीकर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, माजी आमदार अमरसिंह पंडित यांसह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर

नुकतेच शासनाने दुष्काळग्रस्त जिल्हे व तालुके जाहीर केले आहेत. यात बीड जिल्ह्यातील बीड, गेवराई, माजलगाव, केज, आंबेजोगाई, परळी, आष्टी, पाटोदा, शिरूर, धारूर आणि वडवणी हे सर्व ११ तालुके अधिकृतपणे दुष्काळग्रस्त म्हणून घोषित करण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना विविध सवलती आणि मदत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

कॅप्री ग्लोबल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

CAPRI GLOBAL HOUSING FINANCE LIMITED

नोंदणीकृत व कॉर्पोरेट कार्यालय: ५०२, टॉवर-ए, पेनिन्सुला बिजनेस पार्क, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई - ४०००१३ **सर्कल कार्यालय:** ९बी, दुसरा मजला, पुसा रोड, नवी दिल्ली - ११००६०

परिशिष्ट IV ताबा सूचना (अचल मालमत्तेसाठी)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे कॅप्री ग्लोबल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड(सीजीएचएफएल) चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ मधील नियम ३ सह वाचण्यात येणाऱ्या अनुच्छेद १३(१२) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत कंपनीच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी खाली नमूद कर्जदार/ जामीनदारांना मागणी सूचना पाठवली ज्यात त्यांना सदर सूचनेत नमूद रकमेचा सदर सूचना प्राप्त होण्याच्या दिनांकापासून ६० दिवसांचे आत भरणा करण्याचे आवाहन करण्यात आले होते. कर्जदार सदर रकमेची परतफेड करण्यात असमर्थ ठरल्याने याद्वारे कर्जदार/ जामीनदार आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स, २००२ मधील अनुच्छेद १३ मधील उप-विभाग (४) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा घेतलेला आहे. सदर अनामत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कर्जदारांचे लक्ष सदर अधिनियमातील अनुच्छेद १३ मधील उप-विभाग (८) कडे वेधण्यात येते. याद्वारे कर्जदार व सर्व लोकांना सावधगिरीची सूचना देण्यात येते की त्यांनी सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार करू नये आणि असा कोणताही व्यवहार केल्यास तो सीजीएचएफएलच्या खाली नमूद रक्कम अधिक तीवरील व्याजाच्या भाराधीन असेल.

अ. क्र.	कर्जदार/ जामीनदाराचे नाव	अनामत मत्तेचे वर्णन (अचल मालमत्ता)	मागणी सूचनेचा दिनांक व रक्कम	ताबा दिनांक
१	**(कर्ज खाते क्र. LNHLARG000024183 (जुना) ५१२००००६१९५६७ (नवीन) आमची औरंगाबाद शाखा) सुशील बहिरू निकम** (कर्जदार) **ज्योती सुशील निकम** (सह-कर्जदार)	मालमत्ता जमीन व इमारत: प्लॉट क्र. ५५-ए आणि ५५-बी, सर्वे क्र. ५८, मौजे वैजापूर, जिल्हा औरंगाबाद, महाराष्ट्र - ४२३७०१, क्षेत्रफळ सुमारे ७७६.०१ चौ.फू., मालमत्तेच्या चतु:सीमा: उत्तरेस- सर्वे क्र. ५८/०१ चा प्लॉट, दक्षिणेस- सर्वे क्र. ५४-बी चा प्लॉट, पूर्वेस- ९ मी. रस्ता, पश्चिमेस - सर्वे क्र. ५८/०१ चा प्लॉट.	०६.०७.२०२६ रु. २३,३४,६८६.९९	२१.०९.२०२६

स्थान: औरंगाबाद
दिनांक: २७.०९.२०२६

स्वा/- (प्राधिकृत अधिकारी)
कॅप्री ग्लोबल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (सीजीएचएफएल) करिता

ढोल-ताशांच्या गजरात गणरायाला निरोप

प्रमुख मार्ग गर्दीने फुलले, १५ तास मिरवणूक

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : ढोल पथकांचा पारंपरिक ठेका धरायला लावणारा नाद, चाळीसगाव, इंदोरचे ब्रास बँड यांच्या साथीने गुलालाची उधळण करीत छत्रपती संभाजीनगरच्या भक्तांनी गणरायाला निरोप दिला. १५ तास ही मिरवणूक चालली. सकाळी संस्थान गणपतीच्या आरतीनंतर ११ च्या सुमारास विसर्जन मिरवणूक मार्गस्थ झाली.

राजाबाजारातील श्री संस्थान गणपतीची सकाळी ११ वाजता आरती झाली. मानाच्या ग्रामदैवताच्या रथाला मान्यवरांनी ओढत शहागंजपर्यंत आणले. संस्थान गणपतीपासून सुरू होणारी ही मुख्य मिरवणूक शहराच्या गणेशोत्सवाची जुनी परंपरा आहे. याच मार्गावरून शहागंज, सिटी चौक, गुलमंडी आणि पुढे जिल्हा परिषद मैदानापर्यंत गणेशमूर्तींची मिरवणूक जाते.

सकाळपासूनच बेगमपुऱ्यातील बहुतांश मंडळे रांगेत लागले होते. सकाळी ७ पासून अहिरवंश क्रीडा मंडळ सिटी चौकात रांगेत लागले होते. शाहगंज ते सिटी चौक, बुढ्ढीलेन रस्त्यावर मंडळांच्या रांगा लागत गेल्या. संस्थान गणपती निघाल्यानंतर या रांगेने मिरवणुकीचे रूप घेतले. दुपारी १२ च्या सुमारास नव सार्वजनिक गणेश मंडळ आणि बाल कन्हैय्या मंडळाच्या नवसाच्या राजाची आरती सुरू होती. राजाबाजारमधील दोन मंडळे पुढे रांगेत होती. भवानीनगरचा राजा, बांबू गल्लीच्या अष्टविनायक गणेश मंडळाचा लालबाग राजा आणि मुळूमची बाजार-सराफा रोड येथील शिवसेना गणेश मंडळाचा राजा मिरवणुकीत सहभागी झाले. दुपार ओलांडली आणि जुन्या शहरातील रस्त्यांवर गणेशमूर्तींची हालचाल वाढली. गुलमंडी, औरंगपुरा, सिटी चौक या परिचित रस्त्यांवरून गणराय पुढे सरकत राहिले. रात्री उशिरापर्यंत गणेश मंडळांचे कार्यकर्ते गणरायाला निरोप देण्यासाठी ढोल ताशाच्या गजरात शहरातील मिरवणूक मार्गावर होते.

गणेश मंडळांची शिस्त

दरवर्षीप्रमाणे यंदाही गणेश मंडळांची शिस्त, प्रत्येकाचा आपला ड्रेस कोड आणि ढोल पथक तसेच वाद्य पथकांचा भूरळ पाडणारा अखंड निनाद, हेच यंदाच्याही मिरवणुकीचे वैशिष्ट्य ठरले. मुलींचा तसेच तरुणींचा वाद्यपथक तसेच ढोलपथकांमधील सहभाग, यंदा खास होता.

मदतीचे स्वरूप स्पष्ट करा -आदित्य ठाकरे

लोकसत्ता वार्ताहर

धाराशिव : दुष्काळ जाहीर झाला; मात्र या दुष्काळातून शेतकऱ्यांच्या हातात आणि बांधावर नेमके काय मिळणार, हे सरकारने जनतेला स्पष्ट सांगावे, असे आवाहन शिवसेना नेते आमदार आदित्य ठाकरे यांनी केले. तुळजापूर तालुक्यातील खानापूर येथे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधताना सरकारने मदतीचे स्वरूप स्पष्ट करून शेतकऱ्यांना धीर द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

> आत्महत्येचा विचारही मनात आणू नका. दुष्काळाच्या संकटाने खचून जाऊ नका. आज आम्हाला राजकारण करायचे नाही. आम्ही जमिनीवर आहोत आणि शेतकऱ्यांबरोबर राहणार आहोत. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी आणि त्यांना धीर देण्यासाठी मला पाठवले आहे.
> **-आदित्य ठाकरे,** आमदार

खानापूर येथील शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन ठाकरे यांनी प्रत्यक्ष पिकांची पाहणी केली. यावेळी शेतकऱ्यांनी कर्जमाफी, पीकविमा, पीकनुकसान, रब्बीची पेरणी, जनावरांचा चारा आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह अशा अनेक प्रश्नांचा पाढा त्यांच्यासमोर मांडला. 'सोयाबीनच्या शेंगा हातात, पण दाणा कुठे?' शेतातील उर्वरित सोयाबीन हिरवे दिसत असले तरी त्यात दाणा भरलेला नसल्याची व्यथा एका शेतकऱ्याने मांडली. त्याने सोयाबीनच्या शेंगा आदित्य ठाकरे यांच्या हातात देत प्रत्यक्ष त्या फोडून पाहण्यास सांगितले. शेंगांमध्ये दाणा नसल्याचे निदर्शनास आल्यानंतर 'एकरी हजारो रुपये खर्च करूनही शेतातून एक पैसाही मिळणार नाही; वर्षभर जगायचे कसे?' असा सवाल शेतकऱ्यांनी केला. मुलांचे शिक्षण, औषधोपचार, मुला-मुलींची लग्ने, रब्बीची पेरणी आणि घरखर्च भागवायचा कसा, असा प्रश्न शेतकऱ्यांनी उपस्थित केला. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे लवकरच शेतकऱ्यांशी संवाद साधण्यासाठी दौऱ्यावर येणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यावेळी विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, आमदार कैलास पाटील, आमदार प्रवीण स्वामी, सुषमा अंधारे, नंदूराजे निंबाळकर, संजय निंबाळकर, श्यामल पवार, श्याम पवार, सुधीर कदम, राज अहमद पठाण, धुळाप्पा राक्षे, सुनील जाधव, जगन्नाथ गवळी यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते. इटकळ, खानापूर, काटगाव, मंगरूळ, नांदुरी तसेच पंचक्रोशीतील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यूनियन बँक ऑफ इंडिया Union Bank of India

भारत सरकार का उपक्रम A Government of India Undertaking

क्षेत्रीय कार्यालय - अहिल्यानगर
प्लॉट नं. ३,४,८ व ९, पहिला मजला,
नागापूर पुलाजवळ, नगर-मनमाड रोड,
नागापूर, अहिल्यानगर - ४१४१११

ई-लिलावाद्वारे विक्री सूचना

तमाम जनता तसेच कर्जदार आणि जामिनदार यांना कळविण्यात येते की, बँकेच्या अधिकृत अधिकाऱ्यांनी खाली नमूद केलेली **युनियन बँक ऑफ इंडिया** यांच्याकडे तारण असलेल्या मालमत्तेची सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट २००२ नुसार **ताब्यात घेतलेल्या मालमत्तेची** खाली नमूद केलेली येणे बाकी त्यावरील भविष्यातील व्याज व इतर खर्च याची वसुली करण्यासाठी ई-ऑक्शन पद्धतीने मालमत्तेची विक्री करण्याचे ठरवले आहे. सदर मालमत्ता बँकेच्या अधिकृत अधिकाऱ्यांनी **'जशी व जेथे आहे'** आणि **'जे काही आहे'** आणि **'आमच्यावर विना अवलंबित'** तत्त्वावर कोणत्याही प्रकारच्या हमी आणि नुकसानीशिवाय विक्री (ई-ऑक्शन) करण्याचे ठरवले आहे. खाली दिलेल्या मालमत्तेचा ऑनलाईन ई-ऑक्शनद्वारे ऑनलाईन पद्धतीने **https://baanknet.com** या वेबसाईटद्वारे खाली नमूद केलेली थकबाकी त्यासोबत त्यावरील व्याज व इतर खर्च वसुलीसाठी दिनांक **१३-१०-२०२६** रोजी जाहीर लिलाव केला जाणार आहे.

अ. क्र.	कर्जदाराचे नाव	मालमत्तेचे वर्णन	राखीव किंमत आणि बयाणा रक्कम	व्याजासहीत थकबाकी	बयाणा रक्कम भरणेसाठी खाते क्र./ IFSC/शाखा	बोलीची वाढीव रक्कम रु.	ताब्यातील प्रकार
१	श्री. सुधीरकुमार खेतालाल पटेल (कर्जदार) श्रीमती हर्षा सुधीरकुमार पटेल (सहकर्जदार)	श्री. सुधीरकुमार खेतालाल पटेल यांची मिळकत - निवासी फ्लॅट नं. जीएफ-०१, इमारत नं. १, ब-विंग, न्यू पारिजातक गृहनिर्माण संस्था मर्यादित, स्किम-अ, क्लस्टर नं. ३, बांधीव प्लॉट नं. ३९, गट नं.७ (भाग), बिल्टअप क्षेत्र ५२.०४ स्के.मी. औरंगाबाद म्युनिसिपल कार्पोरेशनच्या कार्यकक्षेत. मौजे नक्षत्र वाडी, तालुका व जिल्हा औरंगाबाद-४१३००२. पुढीलप्रमाणे चतुःसिमा- पूर्वः न्यू रागिनी ब-०२ इमारत, दक्षिणः १२ मीटर रुंद डीपी रस्ता, पश्चिमः फ्लॅट नं. जीएफ-०४, उत्तरः फ्लॅट नं. जीएफ -०४ अ-विंग.	राखीव किंमत रु. ९,६४,०००/- बयाणा रक्कम रु. ९६,४००/-	रु. १६,४०,०१३.७९/- (रुपये सोळा लाख चाळीस हजार तेरा रुपये आणि एकोणऐंशी पैसे मात्र) दि. ३१.०८.२०२३ पर्यंतचे एकूण येणे + (व्याज व शुल्क) भविष्यातील व्याज व इतर खर्च	615701980050000 of Union Bank of India, Station Road, Ch. Sambhajinagar Branch IFSC code UBIN0561576	१२०००/-	प्रत्यक्ष
२	अमर बिन बादर बेलाहमर (कर्जदार) श्रीमती शोरा बेगम (सहकर्जदार)	श्री. अमर बिन बादर बेलाहमर व श्रीमती शोरा बेगम यांची मिळकत - निवासी मालमत्ता फ्लॅट नं. सी-१४, चौथा मजला, (एकूण मोजमाप बिल्टअप ५५.३४१ स्के.मी. म्हणजेच ७४६.८१९ स्के.फूट), प्लॉट नं. ५४ ते ५७, ६०, व ६१, सर्व्हे नं. ७७, राधाकृष्ण रेसिडेन्सी, सातारा परिसर, औरंगाबाद-४३१००१, महाराष्ट्र. चतु:सीमाः पूर्वः रस्ता, पश्चिमः प्लॅट नं. ब-१८, उत्तरःफ्लॅट नं. सी-१५, दक्षिणः फ्लॅट नं. सी-१३	राखीव किंमत रु. ०९,८८,०००/- बयाणा रक्कम रु. ९८,८००/-	रु. १९,४६,५९०.५०/- (एकोणवीस लाख सेहचाळीस हजार पाचशे नव्वद रुपये व पन्नास पैसे मात्र) दि. २९.०४.२०२३पर्यंतचे एकूण येणे + (व्याज व शुल्क) भविष्यातील व्याज व इतर खर्च	344501980050000 of Union Bank of India, Ch. Sambhajinagar Main Branch, IFSC Code UBIN0534455	१००००/-	प्रत्यक्ष

ई-लिलावाच्या अटी व शर्ती १) लिलाव / बोली ही फक्त ऑनलाईन इलेक्ट्रॉनिक मोडद्वारे वेबसाईट https://baanknet.com द्वारे होईल की जे ई लिलावाच्या संपूर्ण प्रक्रीयेची व्यवस्था व समन्वय ई लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे करतील. २) ही विक्री सिक्यूरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ व २०१६ मध्ये सुधारित केल्याप्रमाणे तरतुदींनुसार काटेकोरपणे होईल. ३) लिलाव दि. १३/१०/२०२६ दु. १२.०० ते सायं. ५.०० या वेळेत दर दहा मिनीटांच्या अमर्याद बोली विस्ताराने होईल. म्हणजेच ई लिलावाची बोली मुदत ही प्रत्येक बोली बोलल्यानंतर आपोआप दर १० मिनीटांनी वाढेल. ४) परिक्षणासाठी संपर्क तपशील - इच्छुक निवीदाकार मालमत्तेच्या परिक्षणासाठी व लिलावासंदर्भात अधिक माहितीसाठी शाखाधिकारी यांचेशी संपर्क साधू शकतात. ५) वर नमूद मालमत्तांवरील बोजा बँक / शाखेला माहीत नाही. निवीदाकारांना सल्ला देण्यात येतो की, ई लिलावात भाग घेणे व त्यांची निविदा सादर करण्यापूर्वी ई लिलाव विक्रीच्या अटी, शर्ती व अन्य तपशीलासाठी बँकेची वेबसाईट https://www.unionbankofindia.co.in/auction-property/view-auction-property.aspx and www.unionbankofindia.co.in ला भेट द्यावी.

येणे थकबाकी संपूर्णपणे परतफेड न झाल्यास तसेच नमुद तारखेला ई लिलाव विक्री रोखण्यासाठी सिक्यूरीटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ चे कलम ८ (६) अन्वये ही कर्जदार व जामीनदार यांना नोटीस समजण्यात येईल.

अहिल्यानगर
दि. २५/०९/२०२६

(हे मराठी भाषांतर असून, मूळ इंग्रजी नोटीस ग्राह्य.)

सही/-
अधिकृत अधिकारी
युनियन बँक ऑफ इंडिया

गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : ६वा मजला, "बी" बिल्डिंग, गंगा ट्रंईनो, लोहेगाव, पुणे-४११०१४, महाराष्ट्र.
शाखा कार्यालय युनिट : गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), महाराष्ट्र.

ई-लिलाव - विक्री सूचना
सरफेसी ॲक्ट अंतर्गत
सुरक्षित स्थावर मत्तेची विक्री

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या रुल्स ८ व ९ यासह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट ("ॲक्ट") अंतर्गत स्थावर मालमत्त्यांच्या विक्रिकरिता ई-लिलाव विक्री सूचना.

सूचना याद्वारा आम जनतेस आणि विशेषकरून ऋणको/ सह-ऋणको / गहाणकार/ हमीदारांना देण्यात येते की, "गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड" (यापुढे ॲक्टनुसार "सुरक्षित धनको" म्हणून संदर्भित) गहाण असलेल्या याखाली वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा ताबा ॲक्टच्या सेक्शन १३(२) अंतर्गत सूचनेच्या अनुसार सिक्युरिटी इंटरेस्ट(एन्फोर्समेंट) रुलच्या रुल्स ८ व ९ यासह वाचलेल्या ॲक्टच्या सेक्शन १३(१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकाऱ्याद्वारे घेण्यात आला आहे. सुरक्षित मत्तेची विक्री ई-लिलावाद्वारा **"जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे काही आहे", आणि "जे काही आहे तेथे आहे"** या तत्वावर **३०.१०.२०२६ रोजी** करण्यात येणार आहे. आम जनतेस याद्वारा कळविण्यात येते की, आम्ही **https://www.bankeauctions.com** या वेबसाइटवर तरतूद केलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्ममार्फत जाहीर लिलावाचे आयोजन करीत आहोत.

विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता कृपया www.grihumhousing.com या "जीएचएफएल"/ सुरक्षित धनकोच्या वेबसाइटवर तरतूद केलेली लिंक पाहावी.

अ. क्र.	प्रस्ताव क्र./ ग्राहकाचे नाव (ए)	मागणी सूचना तारीख व थकित रक्कम (बी)	ताब्याचे स्वरूप (सी)	मालमत्तेचे वर्णन (डी)	राखीव किंमत (ई)	इरठे (राखीव किंमतीच्या १०%) (एफ)	इरठे सादरीकरणाची तारीख (जी)	बोली वृद्धी (एच)	मालमत्तेच्या पाहणीची तारीख व वेळ (आय)	लिलावाची तारीख व वेळ (जे)	ज्ञात भार/ न्यायालयिन प्रकरणे, जर असल्यास (के)
१	लोन नं. : LAP021020000000500 2826/ संजय मोहनराव पगारे (ऋणको)/ अंजू पगारे (सह-ऋणको)	**सूचना तारीख : ११.११.२०२५ एकूण देणी :** रु. १२००७०३/- (रुपये बारा लाख सातशे तीन फक्त) वसूलीपर्यंत १५.८५% प्र. व. दराने पुढील व्याजासह ११.११.२०२५ रोजीप्रमाणे देय	प्रत्यक्ष	पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - प्लॉट नं. ५५, मोजमापाचा एरिआ १११.० चौ.मी., सीटीएस नं. १३८२, मौजे पैठण, ता. पैठण व जि. औरंगाबाद आणि **मालमत्ता पुढीलप्रमाणे सिमित :** पूर्व : अनिल कर्कोटक यांचे हाऊस, पश्चिम : सरस्वतीबाई घनवत यांचे हाऊस, उत्तर : रोड, दक्षिण : विद्या दौंड यांचे हाऊस.	रु. १६८५६८८.००/- (रुपये सोळा लाख पंचाऐंशी हजार सहाशे अठ्ठ्याऐंशी फक्त)	रु. १६८५६८.८०/- (रुपये एक लाख अडुसष्ट हजार पाचशे अडुसष्ट व पैसे ऐंशी फक्त)	२९.१०.२०२६ रोजी सायं. ०५.०० वा. पूर्वी	१०,०००/-	२६.१०.२०२६ (स. ११.०० - दु. ०४.००)	३०.१०.२०२६ (स. ११.०० - दु. ०२.००)	काही नाही

स्वारस्य असलेले बोलीदार / खरीददारांना सल्ला देण्यात येतो की, त्यांनी लिलावात ठेवलेली मालमत्ता व सुरक्षित धनकोच्या शाखेला भेट द्यावी, आणि बोली सादर करण्यापूर्वी सर्व बाबतीत त्याने / तिने / त्यांनी स्वतः निश्चित अतिरिक्त आकार आणि भार तसेच त्रयस्थ पक्षकाराचे हित याबाबत चौकशी करावी आणि स्वतःचे समाधान करून घ्यावे. निश्चित करावयाच्या मालमत्तेशी सलग्न मालमत्ता कर, विद्युत / पाणी देणी व अन्य कोणतीही देणी, जर असल्यास, यासारखी सर्व सांविधिक देणी यशस्वी बोलीदाराद्वारा प्रदान करावयाची आहेत.

स्वारस्य असलेल्या बोलीदारांनी पोर्टलवर स्वतःची नोंदणी करून घेणे आवश्यक आहे आणि लिलाव सेवा-पुरवठाकार "सी१ इंडिया प्रा. लि.", पत्ता : प्लॉट नं. ६८, तिसरा मजला, गुरगाव, हरयाणा-१२२००३, हेल्पलाईन नं. ७२९१९८११२४, २५, २६ सपोर्ट ईमेल आयडी - Support@bankeauctions.com **संपर्क व्यक्ती - धरणी पी, ईमेल आयडी - dharani.p@c1india.com संपर्क क्र. ९९४८१८२२२२** यांच्याकडून आधीच लॉग-इन आयडी व पासवर्ड प्राप्त करावा, जो ई-बोली प्रक्रियेकरिता अनिवार्य आहे. भावी बोलीदारांनी कृपया नोंद घ्यावी की, ते त्यांच्याकडूनच ई-लिलाव प्रशिक्षणाचा लाभ घेवू शकतील. स्वारस्य असलेले खरीददार / बोलीदारांनी २९-१०-२०२६ रोजी किंवा तत्पूर्वी कोणत्याही नॅशनलाइज्ड व शेड्यूल्ड बँकेवर काढलेली खात्याचे नाव - **"गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड", ऑक्शन प्रोसिड्स अका.,** खाते क्र. ०९१५५१०००००२८ व आयएफएससी कोड - ICIC0000915, बँक - आयसीआयसीआय बँक लि., पंचशील टेक पार्क, गणपथी चौकाजवळ, ४३/४४, विमान नगर - ४११०१४ यांच्या खात्यात एनईएफटी / आरटीजीएस / डीडी द्वारा इसारा रक्कम ठेव (इरठे) जमा करणे आवश्यक आहे आणि https://www.bankeauctions.com यावर त्यांच्या नावांची नोंदणी करावी आणि सेवा-पुरवठाकाराकडून ई-लिलावावरील प्रशिक्षण घ्यावे व विनामूल्य युजर आयडी व पासवर्ड प्राप्त करावा. वेबसाइटवर त्यांची नोंदणी झाल्यानंतर, स्वारस्य असलेले खरीददार/ बोलीदारांनी खालील अपलोड केलेल्या कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करणे आवश्यक आहे आणि **पत्ता : गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), महाराष्ट्र, मोबा नं. +९१ ८२८११३८१४३ ईमेल आयडी : p.adith@grihumhousing.com** यावर स्वयं-साक्षांकित सत्य पत्र ईमेल करावी व पाठवावी. **शर्ती व अटींवरील अधिक तपशीलाकरिता, कृपया https://www.bankeauctions.com या वेबसाइटला आणि ई-लिलावात सहभागी होण्याकरिता www.grihumhousing.com या वेबसाइटला भेट द्यावी. ही सूचना सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल २००२च्या रुल ८(६) अंतर्गत ऋणको/ सह-ऋणको/ गहाणकार / हमीदारांना ३० (तीस) दिवसीय सूचना म्हणून सुद्धा समजण्यात यावी.**

कोणत्याही प्रकरणात जर तेथे स्थानिक भाषेतील प्रसिद्धी आणि इंग्रजी वृत्तपत्रातील प्रसिद्धीच्या मजकूरात कोणताही फरक आढळून आल्यास, दि इंडियन एक्सप्रेस या इंग्रजी भाषेतील वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेला मजकूर ग्राह्य धरला जाईल.

दिनांक : २७.०९.२०२६, स्थळ : महाराष्ट्र

स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी, गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड